Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

शिवाजी महाराजांचे विरोधकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचे तंत्र

रविन्द्र मुन्द्रे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग ,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

Abstract :-

शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्य निर्माण करताना अनेक जाती, धर्म, पंथीयांचेच संघटन केले नाही तर ज्यांच्या विरोधात ते लढत होते, त्यांना सुद्धा आपल्या आकर्षक व्यक्तिमत्वाने स्वतःच्या ध्येयप्राप्तीत सामावून घेतले होते. महाराजांचा लढा अन्यायी, अत्याचारी व दुष्ट प्रवृत्तीच्या राज्यकर्त्यांबरोबर होता, मग तो हिंदू असो वा मुसलमान, पोर्तुगीज असो वा इंग्रज. त्यामुळे ज्या योद्ध्यांना शिवाजीच्या या कार्यशैलीसाठी कार्य करावे असे वाटत होते, ते त्यांच्याकडे आपला पराक्रम आणि निष्ठा अर्पण करीत असे. म्हणूनच सिद्धी अंबर, शेकडो पठाण सैनिक, हुसेनखान मियाना व त्याचा भाऊ असे अनेक विरोधकांच्या सैन्यातील योद्धे महाराजांच्या सेवेत दाखल झाले. कारण महाराजांचा पराक्रम, धाडस, शूरवीरता आणि प्रजेच्या कल्याणासाठी करीत असलेले कार्य पाहून उपरोक्त वीर योद्ध्यांना आपण शिवाजीच्या मराठा साम्राज्य निर्मितीत आपला सहभाग दर्शविला पाहिजे असे वाटत होते.

Keywords :- शिवाजी महाराज, सिद्धी अंबर, हिंदवी स्वराज्य.

प्रस्तावना :-

शिवाजी महाराजांवर जिजाऊने संस्कारच अशाप्रकारे केले होते की, महाराजांचा स्वभाव करूणामय बनला होता, निष्पाप आणि ज्यांच्यापासून आपल्याला धोका नाही अशांवर तलवार चालविणे म्हणजे मर्द पुरूषार्थाचे लक्षण नव्हे. म्हणून महाराजांनी न्याय बुद्धीने निर्णय घेऊन शत्रूच्या पक्षातील लोकांची सुटका केली. "कल्याणचा शासक मुल्लाना अहमद हा विजापूरी सरदार होता. मुल्लाना अहमद चांदी, सोने, जडजवाहीर आणि रोख रक्कम घेऊन जात असताना शिवाजीने आपले सैनिक पाठवून त्याला लुटले... आबाजी सोनदेवाने कल्याणवर आक्रमण करून तेथील शासक मुल्लाना अहमद याला बंदी बनविले. परंतु शिवाजी महाराजांनी त्याचा सन्मान करून सोडून दिले."[१] याच स्वभावाचा फायदा शिवाजी महाराजांना झाला आणि अनेक विजापूरी आणि मोगली सरदार व सैनिक महाराजांच्या सेवेत दाखल झाले. सैनिकांविषयी आपुलकी आणि जिव्हाळा असणारा शासक तत्कालीन फक्त शिवरायचं होते. आपल्या पराक्रमाची सार्थकता शिवाजी महाराजांच्या सैन्यात जावूनच होऊ शकते. विजापूर किंवा मोगल सैन्यात फक्त पोटभरू कार्य केल्यापेक्षा स्वराज्य निर्मितीत आपले बलिदान केव्हाही श्रेष्ठच राहील ही बाब जेव्हा मुस्लिम सैनिकांच्या लक्षात आली तेव्हा शेकडो सैनिक महाराजांच्या सेवेत दाखल झाले. आपण मुस्लिम जरी असलो तरी पण आपले धार्मिक स्वातंत्र्य आणि आपले हक्क व अधिकार शिवाजी महाराज चांगल्या प्रकारे अबाधित ठेऊ शकतात त्यामुळे शिवाजीची चाकरी करणे म्हणजे आपल्या जीवनातील सुवर्णसंधी आहे. म्हणूनच अनेक विजापूरी आणि मोगल शाहीतील सरदार शिवाजी महाराजांच्या सेवेत दाखल होण्यास तत्पर होते.

प्रत्यक्षरित्या शिवाजी महाराजांच्या सैन्यात जाऊन जर आपण कार्य करू शकत नाही तर अप्रत्यक्षरित्या शिवाजी महाराजांची मदत करायची असे धोरण रूस्तमेजमान सारख्या विजापूर सरदाराने ठेवले होते. म्हणजे महाराज आपली छाप अशाप्रकारे पाडीत असत की, शत्रूसुद्धा त्यांचा मित्र बनण्यास उत्सुक असे. कुतूबशहा सारखे मुस्लिम शासक शिवाजी महाराजांचे चांगले मित्र होते. शिवाजी महाराज त्यांचा आपल्या मोठ्या भावाप्रमाणे सन्मान करीत असत. कर्नाटक मोहिमेच्या वेळी महाराजांचा एक महिनाभर मुक्काम कुतूबशाहीत होता. शिवाजी महाराजांची शिस्त आणि त्यांचा स्वभाव पाहून कुतुबशहा प्रभावित झाला होता.

सिद्दी अंबर व कोंडाणा

शहाजी निजामशाहीत असताना सिद्दी अंबर सोबत त्यांचे चांगले संबंध होते. शहाजीच्या मर्जीतील सिद्दी अंबर होता. त्यामुळे शिवाजीच्या कर्तृत्वाने सिद्दी अंबर त्यांच्याकडे आकृष्ट झाला होता. कोंडाणा आपल्या स्वराज्यात असावा असे जेव्हा शिवाजी महाराजांना वाटू लागले तेव्हा बापूजी मुदगल देशपांडे याला महाराजांनी कोंडाणा घेण्यासाठी पाठविले. सिद्दी अंबर तेव्हा कोंडाण्याचा हवालदार होता. "कोंडाण्याचा हवालदार सिद्दी अंबर वहाब हा आतून शिवाजीस मिळालेला होता त्यामुळे बापूजी मुदगलास फारसा त्रास न होता किल्ला ताब्यात आला."[२] (जुलै १६४७)

शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेत आपण सहभागी झाले पाहिजे आणि आपला पराक्रम शिवाजी महाराजांसाठी अर्पण केला पाहिजे ही भावना सिद्दी अंबरमध्ये निर्माण झाली. निजामशाहीत शहाजी महाराजांनी दाखविलेल्या अचाट पराक्रमाची प्रचिती सिद्दी अंबरला आली होती. शहाजीचे स्वराज्य निर्मितीचे स्वप्न शिवाजी पूर्ण करेल अशी आशा सिद्दी अंबरला होती म्हणून आपण शहाजीच्या पराक्रमी पुत्राला पूर्ण सहकार्य करायला पाहिजे असे सिद्दी अंबरला वाटू लागले म्हणून कोंडाण्याच्या मोहिमेत त्याने शिवाजी महाराजांना मदत करून स्वराज्य निर्मितीत आपल्याला सुद्धा सहभागी करून घ्यावे अशी विनंती केली. "कोंडाणा मोहिमेत सिद्दी अंबरने केलेल्या सहकार्याची पावती म्हणून शिवाजीने सिद्दी अंबर ह्याला आपल्या चाकरीत घेऊन पुणे जहांगिरीची हवालदारी दिली."[३]

शिवाजी महाराजांनी शत्रूच्या चाकरीतून आपल्याकडे आलेल्या मुस्लिम हवालदाराला त्याच्या लायकीचे पद दिले नव्हे त्याहीपेक्षा जास्त अधिकार दिले. महाराजांनी आपल्या चाणाक्ष नजरेने सिद्दी अंबरला पारखलं होतं आणि हा आपल्याशी शेवटपर्यंत विश्वासू राहील हा सुद्धा आत्मविश्वास महाराजांना होता. कारण शिवाजीच्या चाकरीत येणारा, हा एका ध्येयाने प्रेरित होऊन येत असे, फक्त पोटाची सोय होते म्हणून नव्हे. पोट भरण्यासाठी विजापूरी आणि मोगलांचे सैन्य केव्हाही सैनिकांना परवडत असे. कारण तेथील मोहिमा ह्या खूप संथ गतीने होत असत. परंतु शिवाजी महाराज ज्या ध्येयाने प्रेरित झाले होते त्यासाठी गतीमान दैनंदिनी आवश्यक होती. आपले ऐषआरामातील जीवन सोडून गतीमान जीवन जगले पाहिजे असे सिद्दी अंबरला का वाटले असावे? संथ गतीच्या मोहिमा सोडून तो वेगवान मोहिमेत भाग घेण्यासाठी का तयार झाला होता? याला कारण होते नेतृत्व. सिद्दी अंबरने हे जाणले होते की, आपण ज्याच्या चाकरीत काम करायसाठी जात आहो ते नेतृत्व सक्षम आहे. आपण जे फक्त पोटासाठी लढत आहो ते योग्य नसून आपला पराक्रम कुणाच्या तरी कामी यावा आणि आपल्या पराक्रमाचे सार्थक व्हावे. आपला पराक्रम फक्त शिवाजी महाराजांच्याच कामी येऊ शकतो. आपल्या पराक्रमाची सार्थकता शिवाजीच करू शकतो, ही भावना सिद्दी अंबर मध्ये जागृत झाली होती. म्हणूनच त्याने शिवाजी महाराजांसोबत कार्य करण्यास उत्सुकता दाखवून त्यांच्या चाकरीत दाखल झाला. शिवाजी महाराजांनी सुद्धा आपल्या तेजपुंज गुणांनी त्याला आपल्याकडे आकर्षित केले होते. अशाप्रकारे शिवाजी महाराज शत्रू पक्षातील सैनिकांना सुद्धा आपल्याकडे आकृष्ट करून त्यांच्या पराक्रमाला सार्थकी लावीत होते.

शिवाजी महाराज व पठाण सैनिक

शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून आपल्या स्वराज्य निर्मितीस सुरूात केली त्यानंतर राजगड, कोंडाणा, पुरंदर वगैरे किल्ले जिंकण्याचा सपाटा लावला. जेथे शक्तीने होत असेल तेथे शक्तीने व जेथे युक्तीने व मुत्सद्दीगीरीने होत असेल तिथे आपली बुद्धी पणाला लावली. शहाजीचा अल्पवयीन मुलगा स्वराज्य निर्माण करण्याची महत्वाकांक्षा बाळगतो आणि तशाप्रकारे तो कृतीही करीत आहे हे जेव्हा विजापूरच्या लष्करातील पठाणांच्या कानावर गेले तेव्हा त्यांना सुद्धा आपला पराकम शिवाजी महाराजांकडे सार्थकी लागू शकतो असे वाटले. पठाणांचे गुणवैशिष्ट्य म्हणजे हे लोक पराक्रमी आणि इमानदार असतात. धाडस आणि साहस यांच्या नसानसात भिनलेले असते. "... सन १६४८ च्या सुमारास विजापूरच्या लष्करातले पाच-सातशे पठाण शिवाजीकडे नोकरीस आले. तेव्हा गोमाजी नाईक पानसंबळ याने त्याला सल्ला दिला तो फार चांगला म्हणून शिवाजीने मान्य केला व पुढे तेच धोरण ठेवले. नाईक म्हणाला तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत त्यास विन्मुख जाऊ देणे योग्य नाही. हिंदूचाच संग्रह करून इतरांची दरकार ठेवणार नाही अशी कल्पना धरली तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्यास राज्य करणे त्याने अठरा जाती, चारी वर्ण यास आपापले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे."[४]

इ.स. १६४८ मध्ये शिवाजी महाराजांचा लौकिक ऐकून सातशे पठाण शिवाजीच्या चाकरीत दाखल होणे म्हणजे महाराजांचा लढा त्याचवेळी किती गतिमान झाला होता हे दिसून येते. शिवाजी महाराजांनी त्या सातशे पठाणांना मुस्लिम म्हणून हाकलून लावले नाही तर त्यांच्याकडून आपल्या स्वराज्य निर्मितीचे कार्य करवून घेतले. शिवाजी महाराज आपल्या गुणवैशिष्ट्याने आणि ध्येयाने इतके लौकिक पावले होते की विजापूरसारख्या शत्रूच्या प्रदेशातून शेकडो सैनिक महाराजांकडे आकर्षित झाले होते. विजापूरच्या राज्यात हे सैनिक त्रस्त झाले होते किंवा त्यांना वेतन बरोबर मिळत नव्हते असे नव्हे. तर त्यांच्यात असणारी प्रतिभा याची किंमत तिथे होत नव्हती. त्यामुळे जेव्हा महाराजांच्या डंक्याचा आवाज विजापूरपर्यंत पोहचला तेव्हा पठाण सैनिकांना आपले नेतृत्व महाराष्ट्रात आहे असे जाणवू लागले आणि आपला पराक्रम आपण तेथेच दाखविला पाहिजे म्हणून ते विजापूरी चाकरी सोडून महाराजांच्या सैन्यात दाखल झाले. आपल्या कर्तृत्वाने महाराजांनी या सैनिकांना आपल्याकडे आकर्षित केले होते. तत्कालीन परिस्थितीत कुणाजवळही नसणारी ध्येयशक्ती सर्वांना महाराजांमध्ये दिसत होती. शून्यातून विश्व निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा फक्त शिवाजी जवळ दिसत असल्यामुळे पराक्रमी आणि धाडसी पठाण साहजिकच महाराजांकडे आकृष्ट झाले. आपण जरी शिवाजी महाराजांच्या धर्माचे नसलो तरी आपल्या धर्मानुसार शिवाजी वागू देईल इतर सर्वांसाठी तो आपल्याला वागणूक देईल हा सुद्धा आत्मविश्वास या पठाण सैनिकांमध्ये होता. शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण आणि आर्थिक धोरण हे माणसाच्या विकासाचे असल्यामुळे आणि त्यांनी राज्यात केलेल्या सुधारणा मानवाच्या प्रगतीच्या असल्यामुळे धर्म, पंथ,

जात याला काहीही थारा नव्हता. मानवी समाज म्हणून शिवाजी महाराज आपल्या प्रजेकडे पहात होते. हा सर्व गुण वैशिष्ट्यांचा साठा शिवाजी महाराजांजवळ असल्यामुळे पाच-सातशे पठाण विजापूरातून हिंदवी स्वराज्यात दाखल होणे म्हणजे साहजिक बाब होती.

हुसेनखान मियाना आपल्या भावासह महाराजांच्या चाकरीत

शिवाजी महाराजांचे नीतीमान चारित्र्य, आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शत्रूविषयक आदरयुक्त वर्तनाची छाप शत्रूवर पडली होती. शत्रूकडील अनेक सरदार व सैनिक महाराजांच्या या गुणाने त्यांच्या चाकरीत दाखल होत होते. अन्यायी, अत्याचारी व दुष्ट प्रवृत्तीच्या शासकाच्या हाताखाली राहून स्वतःचे आयुष्य कलंकित केल्यापेक्षा मर्दानी पुरूषासारखे रणांगणावर वीरगतीला प्राप्त होणे केव्हाही उचीत आहे. त्यासाठी शिवाजी महाराजांसारख्या शासकाच्या सेवत दाखल होऊन आपण आपले जीवन सफल केले पाहिजे, असे मोगली आणि विजापूरी सैनिकांना वाटत होते. म्हणूनच ते महाराजांच्या सेवेत येण्यास उत्सुक होते.

शिवाजी महाराजांच्या गुणवैशिष्ट्यांचा प्रभाव विजापूर सरदार हुसेनखान मियाना याच्यावर सुद्धा पडला होता. हुसेनखान मियाना हा विजापूरचा सरदार असून त्याच्या पदरी पाच हजार पठाण तिरंदाज, बरचीवाले, आडत्यारी असून तोफखाना होता. हुसेनखान मियाना हा नवाब बहलोलखानाच्या तोडीचा सरदार होता. हंबीरराव मोहीते संपगांवला लष्कर घेऊन गेले असता, हुसेनखान त्यांच्यावर चालून आला. हुसेनखानाचे अनेक लोक मारले गेले. पुष्कळ घोडी मारली गेली. दिवसाच्या दोन प्रहारातून ते रात्रीच्या चार प्रहरापर्यंत युद्ध झाले. या सहा प्रहारांमध्ये सर्व फौज बुडविली गेली आणि हुसेनखान मियानाला कैद करण्यात आले. कैदी हुसेनखान मियानाला शिवाजी महाराजांसमोर उभे करण्यात आले. महाराजांच्या भेटीचा प्रभाव हुसेनखान मियानावर पडला. महाराजांच्या उदार अंतःकरणाची छाप त्याच्यावर पडली. हुसेनखानाचा भाऊ कासमखान हा तुंगभद्रेच्या उत्तरेकडील व बेलवाडीच्या कोपल प्रांतात असलेल्या कोपल किल्ल्याचा किल्लेदार होता. शिवाजी महाराजांनी कैदी बनलेल्या हुसेनखान मियानाच्या मदतीने कोपल किल्ला जिंकून घेतला. यानंतर महाराजांनी हुसेनखान मियानाची सन्मानपूर्वक सुटका केली. हुसेनखानाने आपला भाऊ कासमखान याला शिवाजी महाराजांबद्दल सांगितले. भावाच्या सल्ल्याने कासमखानही बदलून गेला. त्याला सुद्धा शिवाजी महाराजांबद्दल आकर्षण निर्माण झाले. अशातच विजापूरी सत्तेने कोपल प्रांताचा अधिकारी म्हणून मसौदखानाची नेमणूक केली. "मसौदखान हा हुसेनखान मियानाचा प्रतिस्पर्धी असून त्याचे आणि मसौदखानाचे कधीच पटले नाही. मसौदखानाच्या हाताखाली दबून राहून त्याची गुलामगीरी करण्यापेक्षा शिवाजीच्या चाकरीत समाधानपूर्वक राहावे, असा विचार करून हुसेनखान याने विजापूरकरांची चाकरी सोडली आणि तो महाराजांच्या सेवेत आला. स्वराज्याच्या सेवेत महाराजांनी त्याला आणि त्याच्या असंख्य साथीदारांना सन्मानपूर्वक सामील करून घेतले. शिवाजी महाराजांनी त्याच्या सोबतीने बिळगी, जामखिंड, धारवाड या बाजूचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला. मसौदखानाच्या अदोनी प्रांतावर हुसेनखानाने हल्ला करून तो प्रांत उद्धवस्त करून टाकला."[५]

हुसेनखान मियाना सारखा विजापूरचा सरदार जो प्रमुख सरदारांच्या तोडीचा होता. तो शिवाजी महाराजांच्या भेटीने प्रभावित होऊन महाराजांच्या सेवेत दाखल होंतो आणि विजापूरी प्रदेशावर आक्रमण करून स्वराज्यात तो प्रदेश सामील करतो. जो प्रथम विजापूरच्या संरक्षणासाठी लढत होता तो आता त्यांचा शत्रू बनतो. यावरून शिवाजी महाराजांच्या गुणांचा किती प्रभाव त्याच्यावर पडला होता हे दिसून येते. निष्कलंकित जीवन जगून स्वराज्याची स्थापना करायला निघालेल्या शिवाजी महाराजांसोबत आपल्याला काम करण्याची संधी मिळणे म्हणजे आपले जीवन सार्थकी लागणे होय असे हुसेनखानाला वाटत होते. विजापूरी सेन्यात राहून आपण आपले जीवन व्यर्थ घालविले असते. अन्यायी आणि अत्याचारी प्रवृत्तीला खतपाणी घालण्याची चूक आपल्या हातून घडू नये तर स्वराज्य निमिर्तीसाठी झटणाऱ्या शिवाजी महाराज आणि त्यांच्या साथीदारांसोबत राहून आपल्याकडून होईल तेवढे सहकार्य केले पाहिजे, ही भावना हुसेनखानामध्ये निर्माण झाली. हे सर्व घडत होतं शिवाजी महाराजांच्या प्रभावी नेतृत्व आणि कुशल कर्तृत्वामुळे त्यांनी आपलं जीवन स्वराज्यासाठी अर्पण केलं होतं. त्यांच्यात धगधगणारी स्वराज्याची आग प्रत्यक्षरित्या त्यांच्या स्वभावावरून दिसत होती. या स्वराज्याच्या आगीत धर्म, पंथ, जात जळून खाक झाली होती. आपण फक्त हिंदूचेच संरक्षक आहो किंवा मुस्लिमांचे शत्रू आहो हा या विचारांना त्यांच्याजवळ काहीच थारा नव्हता. आपल्याला हिंदवी स्वराज्याची स्थापना करायची आहे. त्यासाठी कोणत्याही धर्म, पंथ, जातीच्या लोकांनी सेवेत येतो, अशी विनंती केली की महाराज त्याच्याबद्दल तिळमात्र शंका न बाळगता त्याला पारखून, त्याच्या योग्यतेचे पद त्याला देत असे. शिवाजी महाराजांजवळ माणसाला पारखण्याची चांगल दृष्टी असल्यामुळे त्यांचा कधीही विश्वासघात झाला नाही.

अफजलखानाची मुले व शिवाजी महाराज

अफजलखानाचा वध करणे हा राजकारणाचा एक भाग होता. मुसलमान म्हणून अफजलखानाला मारले किंवा तो हिंदूची मंदिरे उद्धवस्त करीत आला होता म्हणून मुस्लिम द्वेष आणि हिंदू प्रेम म्हणून त्याला मारले असे म्हणणे चुकीचे होईल. अफजलखानाच्या वधानंतर अफजलखानास मुस्लिम धर्मरितीरिवाजाप्रमाणे दफन केले. त्याच्या थडग्याला दिवाबत्तीची व्यवस्था करून दिली व खर्चासाठी वार्षिक उत्पन्नही लावून दिले. प. महादेवशास्त्री तर म्हणतात, प्रतापगडावर प्रेक्षणीय जर काही असेल तर अफजलखानाची कबर! अफजलखानाबरोबर जे इतर सैनिक मारले गेले, त्या सर्वांचे दफन विधिपूर्वक सन्मानाने करण्यात आले. ज्या सैनिकांनी शरणागती पत्करली, त्यांना मानाच्या जागा देण्यात आल्या, तसेच जाहीर फर्माने काढून खानाच्या मृत्युपूर्वी पुणे, चाकण, इंदापूर, बारामती, सुपे या प्रदेशात मुस्लिमांकडे जी इनामे होती, ती त्यांच्याकडे राहतील असे जाहीर केले.

अफजलखानाच्या मृत्युनंतर संभाजी खोपडेच्या मदतीने जंगलातून मार्ग काढीत फाजलखान कराडला पळून गेला. मात्र खानाची दोन मुले व काही मराठा, मुस्लिम सरदार यांना कैद करून प्रतापगडाकडे नेण्यात आले. "महाराज कैद्यांना भेटण्यासाठी खाली आहे. समोर महाराजांना पाहून कैद्यांना आपला मृत्यू दिसू लागला, ते भीतीने गर्भगळीत झाले. शिवाजी आपणास जिवंत सोडणार नाही असे प्रत्येकास वाटू लागले, पण महाराज जेव्हा त्यांच्या अगदी समोर आले तेव्हा त्यांनी पाहिले महाराजांच्या डोळ्यात अपार करूणा होती,

चेहऱ्यावर प्रेम होते. सद्गतित अंत:करणाने महाराजांनी खानाच्या दोन्ही मुलांना छातीशी धरून कवटाळले, कुरवाळले. हे पाहून सर्व कैद्यांना गहिवरून आले. महाराजांनी त्यांना धन, वस्त्रे, भूषणे व इतर देणग्या देऊन मुक्त केले."[६]

ग्रँट डफ ने सुद्धा आपल्या बखरीत याचा उल्लेख केला आहे. "त्यांनी धर्माचा विचार चित्तात आणलाच नाही. त्या छाप्यात कित्येक लोक धरून नेले. त्यातून जे कोणी गेले, त्यास दु:ख न देता शिवाजीने जाऊ दिले... त्या धरलेल्या लोकांत अफजलखानाची स्त्री व पुत्रही सापडली, ती शिवाजीचा सरदार एक खंडूजी काकडे नामे असे, त्याचे स्वाधीन होती."[७]

शिवाजी महाराजांनी राजकारणाचा भाग म्हणून अफजलखानाचा वध केला होता. परंतु त्याच्या निष्पाप मुलांना त्यांनी छातीशी कवटाळून, त्यांना सोडून दिले होते. पाहणाऱ्यांना याचे आश्चर्य वाटत होते की, एका प्रदेशाचा शासक बापाला ठार मारतो आणि मुलांशी प्रेमाने वागतो. म्हणजे शिवाजी महाराजांचा प्रत्येकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा होता. बापाने स्वराज्यावर हल्ला करून त्या स्वराज्याच्या शासकाला ठार मारण्याची शपथ घेतली होती. त्यात त्या निष्पाप मुलांचा काय दोष, ते तर आपल्या वडिलाबरोबर मोहिमेत सामील झाले होते. बापाच्या गुन्ह्याची सजा मुलांना का म्हणून देण्यात यावी. अशी दृष्टी शिवाजी महाराजांकडे असल्यामुळे किंवा नि:पक्षपाती विचार करण्याची बुद्धी त्यांच्याजवळ असल्यामुळे शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या मुलांना सोडून दिले. शत्रूच्या मुलांना सोडून देणे हे तेथे उपस्थित असणाऱ्या लोकांना साहजिकच नवलाईचे वाटत होते. अफजलखानासारख्या शत्रूला ठार मारणाऱ्याच्या हृदयात त्यांच्याच मुलांना सन्मानजनक सोडून देणारे करूणामय हृदय सुद्धा आहे. अशा पराक्रमी, धाडसी, साहसी आणि करूणामय शासकाची चाकरी आपण केली पाहिजे असे उपस्थित अफजलखानाच्या सैनिकांना वाटले आणि स्वराज्य निर्मितीत आपल्याला सुद्धा सहभागी करून घ्यावे अशी विनंती त्यांनी शिवाजी महाराजांना केली. आपण मुस्लिम आहे आणि शिवाजी हिंदू आहे ही कटू भावना सुद्धा त्यांना स्पर्श करून गेली नाही. कारण शिवाजी महाराजांबद्दल त्यांनी आतापर्यंत फक्त ऐकले होते. परंतु आज ते प्रत्यक्षात आपल्या डोळ्याने पाहात होते. निश्चितच ऐकलेल्या पेक्षा कितीतरी पटीने त्यांना शिवाजी महाराज उदार वाटले होते. शिवाजी महाराजांनी सुद्धा अफजलखानाच्या सैनिकांना ज्यांना परत जायचे होते त्यांची सुटका केली आणि ज्यांना स्वराज्यात चाकरी करायची होती त्यांना त्यांच्या लायकीचे काम देऊन स्वराज्यात ठेऊन घेतले.

शिवाजी महाराज व कुतूबशहा

शिवाजी महाराज आणि कुतूबशहा यांचे मैत्रीचे संबंध निर्माण झाले होते. कारण कुतूबशहा हा शिवाजी महाराजांना घाबरून होता. शिवाजी सारखा पराक्रमी आणि शूर योद्ध्यासोबत शत्रूत्व ठेवणे म्हणजे बकरीचे वाघाशी शत्रूत्व असल्यासारखे होय असे त्याला वाटत होते. शिवाजी महाराज कर्नाटकाच्या मोहिमेवर जातांना कुतूबशहाच्या प्रदेशातून गेले. कुतूबशहाने त्यांचा सत्कार आणि सन्मान भव्य स्वरूपात केला. "पादशहानी कुल नगर शृंगारले, चोफेरी बिंदीस, कुंकम, केशराचे सडे, रंगमाळा घातल्या, गुढिया, तोरणे, पताका, निशाणे नगरात लाविली. नगर नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पहावयास उभे राहिले. नारींनी मंगल आर्त्या अगणित जवळून राजीयास वंदिले. सोने सूपियांची फुले राजियावरी उधळली."[८] खासा कुतूबशहाने आलिंगन देऊन महाराजांची महालात भेट घेतली. शहा आणि महाराज एकाच आसनावर बसले त्यावेळी महाराजांना रत्नजडित अलंकार व वस्त्र देऊन शहाने त्यांचा सत्कार केला. शहा अतिशय आनंदित झाला होता. शिवाजी महाराजांच्या तोंडून अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील छापा, सुरतेची लूट व आग्र्याची भेट या अद्भूत प्रसंगाचे वर्णने ऐकण्याची संधी कुतूबशहाला लाभली होती.

शिवाजी महाराजांनी सुद्धा आपल्या मोठ्या भावाचा दर्जा कुतूबशहाला दिला होता. भागानगरीत प्रवेश करताना कुतूबशहा भागानगराबाहेर यावयास निघाला. तेव्हा महाराजांनी प्रेमाने निरोप पाठविला की, "आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ आपण पुढे न येणे महाराजांचा विनय पाहून कुतूबशहा अत्यंत खूष झाला. एवढेच नव्हे तर कर्नाटक मोहिमेत महाराजांजवळ ५० हजाराहून अधिक फौज होती... या प्रचंड फौजेच्या हालचाली म्हणजे सोपी बाब नव्हती. पाच-दहा हजारांची फौज असली तरी ती जातांना वाटेतील शेती, बागा, खेडी, नगरे यांना त्रास देत जात असे. लोक अशा फौजा पाहताच घरेदारे सोडून पळून जात. परंतु महाराजांच्या फौजेने असा त्रास या मोहिमेत दिलेला दिसत नाही. कुतूबशहाचा प्रदेश लागताच महाराजांनी तमाम लष्करास उद्देशून आज्ञा काढली की, कुतूबशहाच्या रयतेला काडी इतकाही त्रास देऊ नये. महाराजांच्या या आज्ञेचे ज्यांनी पालन केले नाही, त्यांच्या गर्दना मारण्यात आल्या. त्यामुळे जरब निर्माण झाली व ५० हजार सैन्याची कूच अत्यंत शिस्तबद्धपणे झाली."[९]

कुतूबशहा जरी मित्र होता तरी तो एका प्रदेशाचा शासक असल्यामुळे राजकीय दृष्टिकोनातून तो शत्रूच होता. शत्रूबरोबर महाराजांचे असे स्नेहाचे संबंध होते. शत्रूविषयी त्यांनी कधी द्वेषभावना ठेवली नाही. त्यांच्या अंगी माणूसकीचा गहिवर होता. शत्रूची जात व धर्म न पाहता तो माणूस आहे ही त्यांना जाणीव होती. जाती व धर्मावरून शत्रूचा त्यांनी कधी छळ केला नाही, भेदभाव केला नाही. उलट बाजी घोरपडेचा मुलगा मालोजी घोरपडे याला पत्र लिहून त्याला आदिलशहा पेक्षा कुतूबशहाची चाकरी करावी असे सांगितले. "...जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपण काटात घेऊन कुतूबशहासी त्यांची रूजवात करावी... तुमचे गोमटे व्हावे म्हणून पष्टच तुम्हास लिहिले असे. जे काय पठाण तुम्हास देतो त्याची दुगणी आम्ही कुतूबशहापासून तुम्हास देववितच असो किंवा त्यातून अधिकही होऊन येई तरीही देऊन."[१०]

विजापूरीची पातशाही बुडविण्यासाठी कुतूबशहाशी मैत्री करून मालोजी घोरपडे सारखे सरदार कुतूबशहाच्या दरबारात आणावे असा उद्देश शिवाजी महाराजांचा पत्र पाठविण्याचा होता. म्हणजेच शिवाजी महाराजांनी आपल्या अन्यायी आणि अत्याचारी मुसलमान शत्रूला मारण्यासाठी मुसलमान कुतूबशहाशी मैत्री केली होती. कारण जे अवगुण आदिलशहात किंवा मोगलशहात होते ते कुतूबशहात

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

नव्हते त्यामुळे शिवाजी महाराजांना कुतूबशहाशी मैत्री करण्यासाठी वेळ लागला नाही. महाराजांच्या अलौकिक गुणांनी कुतूबशहा आपोआप त्यांच्याकडे आकर्षित झाला.

निष्कर्ष :-

"जनतेच्या सच्च्या पुढाऱ्याजवळ जी देशातील सर्वोत्कृष्ट व्यक्तींना आपल्याकडे आकर्षित करण्याची शक्ती असते ती शिवाजीजवळ मोठ्या प्रमाणात होती. अशी शक्ती लुटारूकडे वा धर्मवेड्या पुढाऱ्यांजवळ नसते. वर्ग, जात, पंथ आणि वर्ण यांना दूर सारून समाजातील सर्वोत्कृष्ट माणसे शिवाजी भोवती गोळा होत असत. कारण समाजाच्या अशा आकांक्षांचे अगदी उत्कट स्वरूपामध्ये शिवाजी प्रतिनिधीत्व करीत होता."[११]

"गुढ आणि अद्भूतरम्य, साहसप्रेमी आणि धाडसी, नशीबवाण... एक भटका सरदार आकर्षित करणारी तिक्ष्ण नजर, लाघवी चर्चा, मनमिळावू आणि सौजन्यशील स्वभाव, सिकंदराप्रमाणे शरणागतास औदार्याने वागविणारा, उत्स्फूर्त आणि तरल बुद्धिमत्तेचा, झटपट निर्णय घेणारा, सीझर प्रमाणे विजीगीषु... दृढ निश्चयी, शिस्त प्रेमी, निष्पात डावपेची, दूरदृष्टीचा प्रतिभावान राजपटू, कुशल संघटक, दिल्लीचे मोगल, विजापूरचे तुर्क, पोर्तुगीज, डच, इंग्रज आणि फ्रेंच या प्रतिस्पर्ध्यांशी चतुराईने राजकारण करणारा..."[१२] हे सर्व वर्णन पोर्तुगीज प्रवासी परेरा याने केलेले आहे. परकीयांनी शिवाजीचे केलेले वर्णन पूर्णतः सत्य होते हे त्यांच्या कार्यशैलीवरून दिसून येते.

शिवाजी महाराजांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव लोकांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात पाडला होता की ते आपलं सर्वस्व महाराजांवर अर्पण करीत असे. त्यांच्याजवळ जे लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्याचे तंत्र होते ते दिवसेंदिवस विकसित होऊन स्वराज्याच्या निर्मितीत राज्यनिष्ठ योद्ध्यांचा संघ निर्माण झाला होता. या राष्ट्रनिष्ठ सैनिकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता स्वराज्य निर्मितीसाठी आपली आहुती दिली.

संदर्भ :-

१) डफ, ग्राण्ट (लेख), मालविय लक्ष्मीकांत (अनु.), ***मराठो का इतिहास***, महामना प्रकाशन मंदिर, इलाहाबाद, पृ. ९७.
२) सरदेसाई, गो.स., ***शककर्ता शिवाजी***, फोएनिक्स पब्लिकेशन, मुंबई, १९३५,पृ. २१९.
३) बेंद्रे, वा.सी., ***छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र***, वा.सी. बेंद्रे, १९७२, पृ. १००.
४) सरदेसाई, गो.स., ***पूर्वोक्त***, पृ. ४०, ४१.
५) शेजवलकर, त्र्यं.शं., ***श्री शिवछत्रपती***, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९६४,पृ. १९६.
६) अमिन सैय्यद, ***महापुरूष शिवाजी महाराज***, पृ. ५४ व ५७.
७) डफ, ग्राण्ट, ***मराठ्यांची बखर***, निर्णयसागर छापखाना, मुंबई, १९१६, पृ. ४८.
८) वाकसकर, वि.स. (संपा.), ***शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर***, श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, १९३०, पृ. ७९.
९) तत्रैव, पृ. ७८.
१०) बेंद्रे, वा.सी., ***महाराष्ट्र इतिहासाची साधने***, खंड ३, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६७, पृ. ३०१.
११) Ranade, M.G., ***Rise of the Maratha Power***, University Mumbai, 1961, p. 117.
१२) Kokadkar, P.R. (अनु.), ***The Portuguese & the Maratha's***, Govt. of Maharashtra, 1975, p. 177.